अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 07 मे 2026 | वर्ष 11 वे | अंक 39 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांची जागतिक विक्रमाला गवसणी

### सलग ८६ मिनिटे स्केटिंग करून रचला इतिहास!




ब्रम्हपुरी :

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ब्रम्हपुरी येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात एका अभूतपूर्व जागतिक विक्रमाची नोंद केली आहे. शाळेच्या १६ विद्यार्थ्यांनी तब्बल १ तास २६ मिनिटे २६ सेकंद सलग स्केटिंग करून आपले नाव 'युएसए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' आणि 'एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्ये सुवर्णअक्षरांनी कोरले आहे.

हा जागतिक विक्रम 'युएसए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' आणि 'एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. यामध्ये भारतातील विविध शहरांतील ५२० हून अधिक विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सर्वात मोठी सामूहिक रोलर स्केटिंग स्पर्धा करून नवा इतिहास घडवला. या महा-उपक्रमात एल.एम.बी. स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या चपळाईने आणि कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

प्रशिक्षक रेश्मा विश्वास निरंकारी यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली सानिध्य खुशाल लांजेवार, स्पर्श बालाजी दमकोंडावार, नील प्रशांत राखटे, हर्ष हरजीत सतवानी, रक्षित युवराज आंबोरकर, नोमान अशरफ खानानी, वंश श्रीकांत ठवरे, अग्रीम मयुर दहीकर, सनाह अनुराग बोरकर, अवनी प्रमोद तिडके, इशानी अमीत केराम, आरोही जगन्नाथ सरकार, भावेश अमीत डेंगानी, शुभम विश्वास निरंकारी, रितेश राहुल सतवानी आणि नकुल संदिप आष्टेकर अशा एकुण १६ विद्यार्थ्यांनी या विक्रमी पराक्रमात मानाचा तुरा रोवला.

या ऐतिहासिक यशानंतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळा प्रशासनातर्फे प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरव करण्यात आला. हा केवळ एक विक्रम नसून विद्यार्थ्यांची जिद्द आणि एकतेचे प्रतीक असल्याचे यावेळी बोलले गेले. या कामगिरीमुळे क्रीडा विश्वात एल.एम.बी. पब्लिक स्कूलचे नाव उंचावले असून, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आगामी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## फसवणूक झालेले १ लाख रूपये फिर्यादीला पोलीसांमार्फत परत

### ब्रम्हपुरी पोलीसांची धडकेबाज कामगिरी



ब्रह्मपुरी /प्रतिनिधी :

मुलीला नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची एक लाख रुपयांनी फसवणूक करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्यानंतर, जप्त केलेली संपूर्ण रक्कम फिर्यादीला परत मिळवून देण्यात ब्रह्मपुरी पोलिसांना यश आले आहे. माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार, पोलिसांनी ही रक्कम आज फिर्यादीच्या स्वाधीन केली, ज्यामुळे 'खाकी'वरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

अड्याळ जाणी येथील रहिवासी यशवंत नागो शेंडे यांना त्यांच्या मुलीला नोकरी लावून देतो, असे खोटे आमिष आरोपींनी दाखवले होते. या बदल्यात आरोपी मनोज दादाजी नरसाळे (३३, रा. नवेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक) व त्याच्या सहकाऱ्यांनी शेंडे यांच्याकडून १,००,००० रुपये उकळले होते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेंडे यांनी ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली.

ब्रह्मपुरी पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ३१८(४) आणि ३(५) अन्वये अपराध क्रमांक १६१/२०२५ नुसार गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करून आरोपीला अटक केली आणि फसवणुकीची पूर्ण रक्कम (१ लाख रुपये) जप्त केली.

जप्त केलेली रक्कम फिर्यादीला परत मिळावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात आला. माननीय न्यायालयाने सदर रक्कम मूळ मालकाला परत करण्याचे आदेश दिल्यानंतर, आज ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या उपस्थितीत यशवंत शेंडे यांना त्यांचे कष्टाचे पैसे सुपूर्द करण्यात आले. पोलीस प्रशासनाने दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलतेमुळे आज माझे पैसे मला परत मिळाले आहेत, मी ब्रह्मपुरी पोलिसांचा अत्यंत ऋणी आहे, असे मनोगत यशवंत नागो शेंडे (फिर्यादी) यांनी प्रसंगी व्यक्त केले. कुणीही नोकरीचे किंवा इतर कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवून पैशांची मागणी करत असेल, तर अशा प्रलोभनांना बळी पडू नका. फसवणूक झाल्यास तातडीने जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.




ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

## संपादकीय...

# जनादेशाचा सांगावा

पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांचे निकाल हे केवळ पाच राज्यांचे राजकीय भविष्य ठरवणारे नाहीत, तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशाच्या राजकारणातील वारे कोणत्या दिशेने वाहतील, याची चुणूक दाखवणारे आहेत. या निवडणुकांमध्ये सुमारे ८२४ विधानसभा जागांसाठी मतदान झाले, तर अंदाजे सोळा कोटींपेक्षा अधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने हा निवडणूक निकाल राष्ट्रीय पातळीवरील राजकीय मनोवृत्तीचा मोठा निदर्शक मानला जात आहे. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा झाली ती पश्चिम बंगालमधील सत्तांतराच्या शक्यतेची, आसाममधील भाजपच्या तिसऱ्या कार्यकाळाची, तमिळनाडूतील नव्या राजकीय समीकरणांची, केरळमधील डावे विरुद्ध काँग्रेस संघर्षाची आणि पुद्दुचेरीतील एनडीएच्या प्रभावाची. या निवडणूक निकालांनी पश्चिम बंगाल व तमिळनाडूमधील आजवरच्या निकालांची परंपराच खंडित केली आहे.

पश्चिम बंगालमधील निवडणूक ही देशातील सर्वाधिक हायव्होल्टेज ड्रामा ठरली. २९३ जागांच्या विधानसभेत बहुमतासाठी १४८ जागांची आवश्यकता असताना प्रारंभीच्या निकालांनुसार भाजपने दोनशेहून अधिक जागांवर आघाडी घेत जोरदार मुसंडी मारली, तर तृणमूल काँग्रेस शंभरच्या आतच सीमित राहिली. हा निकाल ममता बॅनर्जीसाठी मोठा धक्का मानला जात आहे. गेल्या दशकभरात बंगालमध्ये तृणमूलचे वर्चस्व अबाधित होते. मात्र भ्रष्टाचाराचे आरोप, शिक्षक भरती घोटाळा, स्थानिक हिंसाचार आणि ग्रामीण असंतोष याचा फटका तृणमूलला बसला. भाजपने बंगालमध्ये हिंदुत्व, केंद्राच्या योजना, संघटित व सुनियोजित प्रचाराच्या जोरावर घवघवीत यश मिळविण्याच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू केली आहे. त्यात अमित शहा यांची निवडणूक रणनीती आणि नरेंद्र मोदी यांची सभा याचा मोठा परिणाम दिसून आला. बंगालमध्ये भाजपची सत्ता येणे ही केवळ औपचारिकता असल्याने ते पूर्व भारतातील सर्वात मोठे राजकीय यश ठरले. आसाममध्ये भाजपने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली. १२६ जागांच्या विधानसभेत बहुमतासाठी ६४ जागा आवश्यक असताना भाजप आणि मित्रपक्षांनी शंभराहून अधिक जागांवर विजय किंवा आघाडी मिळवली. हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाला मतदारांनी पुन्हा एकदा पसंती दिली. घुसखोरीचा मुद्दा, विकासकामे, पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे भाजपच्या बाजूने गेले. काँग्रेस आणि एआययूडीएफला अपेक्षित यश मिळाले नाही. ईशान्य भारतात भाजपची पकड अजून मजबूत झाली असून हा निकाल काँग्रेससाठी मोठा धक्का आहे. ३० सदस्यीय पुदुचेरी विधानसभेत एनडीएने अठरा जागांवर आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवले, तर काँग्रेस आघाडी दोन आकडीही संख्या गाठू शकलेली नाही. पुदुचेरी भौगोलिकदृष्ट्या लहान असले तरी दक्षिण भारतातील राजकारणासाठी तो महत्त्वाचा प्रदेश आहे. हा दक्षिणेतील भाजप विस्ताराचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

तमिळनाडूत द्रमुक आघाडीने सत्ता गमावली. एआयएडीएमके मागे पडली, पण या निवडणुकीचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाने घवघवीत यश मिळवत राज्याला तिसरा राजकीय पर्याय दिला आहे. स्थानिक भाषा, संस्कृती आणि द्रविडीयन राजकारण समजून घेणे आवश्यक आहे. केरळमध्ये यावेळी मोठा उलटफेर झाला. काँग्रेस नेतृत्वाखालील सत्ता मिळवली, तर एलडीएफ मर्यादित राहिली. पिनराई विजयन सरकारविरोधातील नाराजी, बेरोजगारी, आर्थिक संकट आणि सोन्याच्या तस्करीसारख्या मुद्द्यांनी डाव्या आघाडीला फटका बसला. काँग्रेससाठी हा मोठा ऑक्सिजन आहे. या पाच राज्यांच्या निकालांनी एक स्पष्ट संदेश दिला आहे की मतदार आता अत्यंत प्रगल्भ झाला आहे. तो प्रत्येक राज्यात वेगळा निर्णय घेतो. बंगालमध्ये सत्तांतर, आसाममध्ये स्थैर्य, तमिळनाडूत प्रादेशिक वर्चस्व, केरळमध्ये सत्ता बदल आणि पुदुचेरीत एनडीएला संधी. भारतीय राजकारणात आज जनादेश स्पष्ट आहे, सत्ता हवी असेल, तर जनतेचा विश्वास जिंकावा लागेल आणि तो टिकवायचा असेल, तर अहंकार नव्हे, तर उत्तरदायित्व आवश्यक आहे. हाच या पाच राज्यांतील निवडणूक निकालाचा सांगावा आहे.

# गायत्री यज्ञातून २ हजार घरांमध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार

ब्रह्मपुरी/का.प्र.

अखिल विश्व गायत्री परिवार, ब्रह्मपुरी यांच्या वतीने बुद्ध पौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त 'गृहे-गृहे गायत्री यज्ञ' या अभियानांतर्गत तब्बल २ हजार घरांमध्ये गायत्री यज्ञ यशस्वीपणे संपन्न करण्यात आला.



अखिल विश्व गायत्री परिवार, शांतीकुंज हरिद्वार यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वकल्याणाच्या हेतूने देशभरात एकाच दिवशी व एकाच वेळी हा यज्ञ सोहळा आयोजित करण्यात येतो. त्याच अनुषंगाने ब्रह्मपुरी तालुक्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने विविध गावांमध्ये जाऊन नवीन कुटुंबांशी संपर्क साधला व यज्ञाचे आजच्या काळातील भौतिक तसेच मानसशास्त्रीय महत्त्व समजावून सांगितले. यज्ञ सुलभ पद्धतीने करता यावा यासाठी सर्व कुटुंबांना सूक्ष्म यज्ञ किटचे मोफत वितरण करण्यात आले. वैदिक परंपरेतून आलेला यज्ञ हा पर्यावरण शुद्धीकरण व मानसिक संतुलनासाठी प्रभावी मानला जातो. आजच्या प्रदूषित वातावरणात वाढणारे जिवाणू, विषाणू व विविध रोग यावर उपाय म्हणून यज्ञाची उपयुक्तता अधोरेखित केली जात आहे. तसेच आधुनिक जीवनशैलीत मोबाईल, टीव्ही आदी इलेक्ट्रॉनिक साधनांमधून निर्माण होणाऱ्या हानिकारक किरणांपासून संरक्षण करण्यासाठीही यज्ञ उपयुक्त असल्याचे सांगण्यात आले. यज्ञाच्या माध्यमातून घराघरांत सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित राहण्यास मदत होते, असा अनुभव सहभागी कुटुंबांनी व्यक्त केला. लहान स्वरूपाचा यज्ञ असूनही त्यातून मिळालेल्या आनंद व समाधानाची भावना त्यांनी व्यक्त केली.

या उपक्रमाबद्दल नागरिकांनी गायत्री परिवार ब्रह्मपुरीचे आभार मानले. तसेच या अभियानात सहकार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्ते व नागरिकांचे गायत्री परिवारतर्फे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

ब्रम्हपुरी समाचार अंक
नियमित वाचनाकरीता
www.bramhapuri
samachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# भाजपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश

## ब्रम्हपुरी तहसिल कार्यालयात दिमाखात फडकला विशाल तिरंगा ध्वज

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील तहसील कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या उंच ध्वजस्तंभावर मागील सुमारे एक ते दीड वर्षांपासून राष्ट्रीय तिरंगा ध्वज फडकविण्यात येत नसल्याची अत्यंत गंभीर व संवेदनशील बाब समोर आली होती. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, ब्रम्हपुरी शहराच्या वतीने दिनांक १७/०४/२०२६ रोजी मा. उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देत या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला होता.

या निवेदनात तिरंगा हा देशाच्या स्वाभिमानाचे, एकात्मतेचे व बलिदानाचे सर्वोच्च प्रतीक असल्याचे अधोरेखित करत, शासकीय कार्यालयातच ध्वज न फडकविणे ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच, यापूर्वीही अनेक वेळा तोंडी व



लेखी स्वरूपात निवेदने देण्यात आली असूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली होती.विशेष म्हणजे, आगामी १ मे – महाराष्ट्र दिन लक्षात घेता, किमान त्या दिवशी तरी तहसील कार्यालयात राष्ट्रीय तिरंगा ध्वज विधिवत फडकविण्यात यावा, अशी ठाम मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीस नागरिकांचाही मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता. या निवेदनाची दखल घेत प्रशासनाने अखेर सकारात्मक पावले उचलत आज तहसील कार्यालय परिसरातील उंच ध्वजस्तंभावर राष्ट्रीय तिरंगा ध्वज विधिवत व दिमाखात फडकविण्यात आला. दीर्घ काळानंतर तिरंगा ध्वज फडकताना पाहून नागरिकांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त झाली.

## विनोदिनी

पती-पत्नी सुबह-सुबह आपस में बात कर रहे है...
पत्नी : फिर से लॉक डाउन लग जाए तो अच्छा है... मुझे तो बहुत सुकुन मिलता है...
पति : क्यों...
पत्नी : मुझे कामवाली से ज्यादा आप का काम अच्छा लगता है...
किसी प्रकार की खटपट-कटकट नहीं कोई पगार देने की चिंता नहीं...
२४ घंटे हाजिर... बाई की छुट्टी लेने से मुक्ति और एक बात...
आखिर घर का आदमी है तो चोरी चकारी का भी डर नहीं... बोलो इतना सुकुन और कहाँ...

# जनगणना २०२७ अंतर्गत १५ मे पर्यंत नागरिकांना स्व-गणना करण्याचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे नगरपरिषद ब्रह्मपुरी क्षेत्रात जनगणना २०२७ अंतर्गत दिनांक १ मे ते १५ मे या कालावधीत स्व-गणना (Self Enumeration) चा टप्पा पार पडणार आहे. या टप्प्यात नागरिक आपल्या मोबाईल किंवा संगणकाद्वारे se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा स्व-गणना ॲप द्वारे स्वतःचे कुटुंबाची योग्य माहिती सादर करून जनगणना पूर्ण करू शकतील.

स्वगणना पूर्ण झाल्यानंतर स्व-गणना आयडी SE ID मोबाईलवर एसएमएस द्वारे प्राप्त होईल, तो आपणास जतन करून ठेवायचा आहे. त्यानंतर प्रगणक घरोघरी जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षण दिनांक १६ मे ते १५ जून (पहिला टप्पा) या कालावधीत पूर्ण करतील. सदर टप्प्यात जनगणनेची घर यादी तयार करणे व घरांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे हा टप्पा पार पडेल. या कालावधीत प्रगणक आपल्या घरी येऊन आपणास जनगणना एकूण ३३ प्रश्न विचारतील. सदर प्रश्नांची योग्य व अचूक उत्तरे देणे प्रत्येक कुटुंब प्रमुखास बंधनकारक आहे. अधिकृत ओळखपत्र धारण केलेल्या प्रगणकास सर्वतोपरी सहकार्य करून योग्य व अचूक माहिती देऊन नगरपरिषदेला सहकार्य करावे.

दिनांक २७ मे २९ एप्रिल २०२६ या कालावधीत प्रगणक व पर्यवेक्षकांची कार्यशाळा ई लायब्ररी ब्रह्मपुरी येथे पार पडलेली असून नियुक्त प्रगणकांना व पर्यवेक्षकांना याबाबत आवश्यक असलेले संपूर्ण प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच याबाबत अधिक माहितीसाठी नगरपरिषद ब्रह्मपुरी येथे जनगणना-२०२७ या स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून नागरिक सदर कक्षात भेट देऊन अधिक माहिती प्राप्त करून घेऊ शकतात. प्रगणाक सदर सर्वेक्षण दरम्यान कोणतेही दस्तऐवज, OTP ई. बाबत मागणी करणार नाही. त्यामुळे यासंबंधात होणाऱ्या स्कॅम पासून सावध राहण्याचे आवाहन चार्ज अधिकारी जनगणना २०२७ तथा मुख्याधिकारी, नगर परिषद ब्रम्हपुरी डॉ. माधुरी सलामे यांनी केले आहे.

# ख्रिस्तानंद कनिष्ठ महाविद्यालयाचा उत्कृष्ठ निकाल



कु. युग्ना गौड
७८.६७ टक्के



राकेश सहारे
७८.३३ टक्के



अमन रामटेके
७६.१६ टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत फेब्रुवारी २०२६ ला घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून यामध्ये स्थानिक ख्रिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज चा निकाल ९८.४८ टक्के लागलेला आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्कृष्ठ निकालाची परंपरा कनिष्ठ महाविद्यालयाने कायम राखली आहे.

कु.यग्ना सुदर्शन गौड हीने ७८.६७ टक्के गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळविला. तर राकेश राजू सहारे याने ७८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय येण्याचा मान मिळविला. अमन अरविंद रामटेके याने ७६.१७टक्के गुण मिळवीत तृतीय येण्याचा मान मिळविला. कनिष्ठ महाविद्यालयातून ६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

ख्रिस्तानंद स्कुल इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देणारी परिसरातील सर्वात जुनी संस्था असून उच्च विद्याविभूषित शिक्षक, नियमित होणारे वर्ग,मुबलक शैक्षणिक सोईंची उपलब्धता यामुळेच दरवर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागत असतो. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर शिबू मोनीपल्ली, मुख्याध्यापक फादर बिनु थॉमस, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

# प्रा.डॉ. रविंद्र विखार यांचा संताजी स्नेही मंडळातर्फे गौरव

ब्रह्मपुरी/का.प्र.

श्री संताजी प्राध्यापक व कर्मचारी वृंद स्नेही मंडळाच्या वतीने कुरखेडा येथील श्री गोविंदराव मुनघाटे महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रवींद्र विठोबा विखार यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फीमेल एज्युकेशन सोसायटी चंद्रपूरचे अध्यक्ष ॲड. विजय मोगरे तर उद्घाटक म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कलगुरू डॉ. श्रीराम कावळे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार अभिजीत दादा वंजारी, पांडुरंग आंबटकर, भाग्यवानगी खोब्रागडे, मुल येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल वैरागडे साहेब, डॉ.नामदेवराव वरभे, सूर्यकांत खनके, प्राचार्य डॉ. नंदाजी सातपुते, प्रा. डॉ. संजय बेले इत्यादींच्या उपस्थितित डॉ. रवींद्र विखार यांना गौरविण्यात आले.

प्रा.डॉ .रवींद्र विखार यांची सात पुस्तके प्रकाशित झालेली असून अनेक पुस्तके गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समाविष्ट करण्यात आलेली आहेत. त्यांची ७५ हुन अधिक संशोधन पेपर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जनरर्लस मध्ये प्रकाशित आहेत. त्यांनी राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग घेऊन अनेक संशोधन पेपरांचे वाचन केलेले आहेत. गोंडवाना विद्यापीठाच्या समासशास्त्र विषयाचे ते आचार्य पदवीचे मार्गदर्शक आहेत.त्यांना ब्रह्मपुरीभूषण, समाज भूषण असे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेली आहेत. त्यांच्या या सर्व बाबींची दाखल घेऊन संताजी स्नेही मंडळाच्या वतीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**जल है तो कल है...**

# नवेगांव खुर्द येथील मामा तलावाची फुटलेली पाळ तातडीने दुरूस्त करा

## माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमूरकर यांची मागणी




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील मौजा नवेगाव खुर्द येथील मामा तलावाची मागील वर्षी अतिवृष्टीमुळे फुटलेली पाळ तातडीने दुरुस्त करण्यात यावी, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रमोदभाऊ चिमुरकर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नवेगाव खुर्द परिसरातील शेतकऱ्यांसाठी मामा तलाव हा अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. जून-जुलै २०२५ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास तलावाच्या मध्यभागातील पाळ फुटल्याने अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी बाहेर पडले होते. या पाण्यामुळे नवेगाव खुर्द तसेच मेंडकी परिसरातील शेतांमध्ये जलभराव निर्माण झाला होता. सुमारे २५ एकरांहून अधिक क्षेत्रातील धान पीक पूर्णतः नष्ट झाले होते. तसेच तलावातील मत्स्य व्यवसायालाही मोठा फटका बसला होता. अनेक शेतकऱ्यांचे पीक वाहून गेले असून लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागले होते. याशिवाय तलावाची पाळ फुटल्यानंतर तलावात पाणी साठवण न झाल्याने उर्वरित शेतकऱ्यांनाही सिंचनासाठी पाण्याअभावी अडचणींचा सामना करावा लागला. परिणामी अनेक शेतकऱ्यांना उत्पादन घेणे कठीण झाले होते.

घटनेला जवळपास नऊ महिने उलटून गेले असतानाही अद्याप तलावाच्या पाळीच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. आता एप्रिल महिना संपत आला असून पावसाळा तोंडावर आला आहे. त्यामुळे पुन्हा अशीच परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी शेती हंगाम सुरू होण्यापूर्वीच मामा तलावाच्या फुटलेल्या पाळीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी जोरदार मागणी प्रमोदभाऊ चिमुरकर यांनी केली आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी नेहमी पुढाकार घेणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या प्रमोदभाऊ चिमुरकर यांच्या या मागणीमुळे नवेगाव खुर्द परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

❃❃❃❃❃❃❃

# आम.विजय वडेट्टीवार यांची रुग्णवाहिका सेवा ठरतेय जनतेसाठी जीवनदायिनी

## स्वखर्चातून उभा केलेला जीवनदानाचा ध्यास

ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी आशेचा किरण ठरलेला एक स्तुत्य उपक्रम सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांनी स्वखर्चातून रुग्णवाहिका उपलब्ध करून देत मानवतेचा आदर्शच उभा केला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना अक्षरशः नवजीवन मिळत असल्याचे भावनिक चित्र सध्या परिसरात पाहायला मिळत आहे.

ग्रामीण भागात अद्ययावत वैद्यकीय सुविधा अपुऱ्या असल्याने गंभीर रुग्णांना नागपूर, गडचिरोली, वर्धा यांसारख्या शहरांमध्ये हलविणे अनेकदा अत्यावश्यक ठरते. मात्र, आर्थिक अडचणी, वाहतुकीचा अभाव आणि वेळेची मर्यादा यामुळे अनेकांचे जीव धोक्यात येतात. हीच ज्वलंत समस्या ओळखत विजय वडेट्टीवार यांनी स्वतःच्या खर्चातून रुग्णवाहिका सुरू करून सेवेचा नवा अध्याय लिहिला आहे. या रुग्णवाहिका सेवेमुळे केवळ वाहतूकच नव्हे, तर वेळेशी सुरू असलेल्या शर्यतीत




रुग्णांना एक मोठा दिलासा मिळत आहे. विशेष म्हणजे, या सेवेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही; फक्त डीझेलचा खर्च घेतला जात असल्याने ही सेवा सर्वसामान्यांसाठी अत्यंत परवडणारी ठरत आहे. त्यामुळे अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना या उपक्रमाचा मोठा आधार मिळत असून, 'वेळेवर उपचार मिळाल्याने जीव वाचला' अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहेत. समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि जनतेच्या वेदनांची जाणीव ठेवून उभारलेला हा उपक्रम इतर लोकप्रतिनिधींनाही प्रेरणा देणारा आहे. विजय वडेट्टीवार यांच्या या कार्यामुळे 'लोकप्रतिनिधी म्हणजे केवळ पद नव्हे, तर जबाबदारी' याची प्रचिती नागरिकांना येत आहे.

दरम्यान, या सेवेसाठी आमदारांच्या जनसंपर्क कार्यालयातील वैद्यकीय मदत कक्षाचे सुधीर पंदीलवार, राहुल मैंद यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले असून, अधिकाधिक गरजू रुग्णांनी या जीवनदायी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके व शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत यांनी केले आहे.

# राष्ट्रसंतांनी मानवतावादी दृष्टीकोन अंगिकारला

## प्राचार्य डॉ. शेकोकर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती




ब्रह्मपुरी/का.प्र.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अखिल भारतीय गुरुदेवा सेवा मंडळाची स्थापना करुन मानव व समाज उत्थानाचे कार्य केले. आपल्या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष राहिले आहेत. इथे त्यांच्या विचाराचा वारसा आहे. खंजेरी भजन माध्यमातून त्यांनी राष्ट्र व समाजजागृती केली. राष्ट्रसंतांनी सर्वसमावेशक मानवतावादी दृष्टिकोन अंगीकारला', असे विवेचन प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त बोलत होते.सर्वप्रथम महाराजांच्या फोटोला प्राचार्य डॉ शेकोकर व मेजर विनोद नरड यांनी माल्यार्पण केले. डॉ धनराज खानोरकरांनी राष्ट्रसंतांचे 'हर भेश मे तू/हर देश मे तू ' हे भजन गावून अभिवादन केले.

त्यानंतर उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ मोहन कापगते, डॉ रतन मेश्राम, डॉ युवराज मेश्राम, डॉ योगेश ठावरी, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ सुनिल चौधरी, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ किशोर नाकतोडे, अधीक्षक संगीता ठाकरे, डॉ कुलजित शर्मा, डॉ अरविंद मुंगोले, डॉ हर्षा कानफाडे, डॉ विवेक नागभीडकर, डॉ मिलिंद पठाडे, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ राजू आदे, डॉ दर्शना उराडे, प्रा निलिमा रंगारी, प्रा बालाजी दमकोंडवार, प्रा आकाश मेश्राम, डॉ अतुल येरपुडे, प्रा जयेश हजारे, प्रा धिरज आतला, डॉ अभिमन्यू पवार, प्रा बंडू गेडाम इ.मान्यवरांनी पुष्प वाहून महाराजांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्राम यांनी तर यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ कुलजित शर्मा, डॉ मेश्राम, डॉ खानोरकर, प्रा आतला, जगदिश गुरनुले व प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

**झाडे लावा, झाडे जगवा**

# दिव्यांग तपासणी शिबीर ११ मे ला ब्रम्हपुरीत

## दिव्यांगांनी शिबीराला उपस्थित राहण्याचे प्रा. देशकर यांचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

संजय गांधी निराधार योजनेसाठी शासनाने 'युडीआयडी' प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे. संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मोबाईल मेसेज द्वारे कळविण्यात येत आहे की त्यांनी 'युडीआयडी' कार्ड काढून त्याची एक प्रत तात्काळ संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयात जमा करावे, अन्यथा त्यांचे चालू अनुदान थेट बंद करण्यात येईल. भांबावलेल्या संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचा लोंढाचा लोंढा चंद्रपूरकडे वळू लागला.

सामान्य रुग्णालय चंद्रपूरची नियमावली किचकट आणि वेळ खाऊ असल्यामुळे आणि जिल्ह्यातील वारेमाप लाभार्थी सामान्य रुग्णालयात येत असल्यामुळे लाभार्थ्यांना शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. ही गोरगरीब दिव्यांग बांधवांची धावपळ ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर यांना पाहावली नाही. त्यांची धावपळ पाहून भाऊंचे हृदय हेलावून गेले. त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे यांना दिनांक १८ मार्च २०२६ रोजी एक पत्र देऊन ब्रम्हपूरी तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी येथे दिव्यांग तपासणी शिबिर घेण्याची विनंती केली.

कर्तव्यदक्ष जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय चंद्रपूर यांनी अतुलभाऊंच्या पत्राची सहानुभूती पुर्वक दखल घेऊन ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी येथे दिनांक ११ मे २०२६ रोजी ब्रम्हपुरी येथे शिबीर घेण्याचे नियोजन केले. सामान्य रुग्णालय ब्रह्मपुरीच्या अधिक्षकांना निर्देश दिले कि, ब्रम्हपूरी येथे होणाऱ्या दिव्यांग तपासणी शिबिराकरिता अधिकारी व कर्मचारी यांना रुग्ण तपासणी करीता पाच रूमची व्यवस्था करावी व येणाऱ्या रुग्णाला ओपीडी कार्ड देण्यात यावे. तसेच 'युडीआयडी' ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी ब्रह्मपुरी तालुक्यातील संपूर्ण दिव्यांग बांधवांनी दिनांक ११मे रोज सोमवारला होणाऱ्या तपासणी शिबिरामध्ये सहभाग नोंदवावा, तपासणी करून घ्यावी.आणि संजय गांधी निराधार योजनेसाठी अत्यावश्यक 'युडीआयडी'कार्ड प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी केले आहे.

# कन्हाळगाव जि.प. शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्हाळगाव येथे १ मे महाराष्ट्र दिन व शाळा पूर्व तयारी मेळावा आणि वर्ग ४ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

[illegible] ग्रामाच्या अध्यक्षस्थानी कन्हाळगाव येथील ग्रामपंचायतचे प्रशासक काकाजी मीसार होते. प्रमुख अतिथी म्हणून साप्ता.पवनपर्व चे संपादक जीवनभाऊ बागडे, पोलीस पाटील योगेश पेंदाम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल मिसार, उमेदच्या अध्यक्षा निताताई सोंदरकर, अंगणवाडी सेविका सविता उईके, शुभांगी धनविजय, माता पालक तसेच सदस्य भाऊराव मेश्राम व गावातील युवक व युवती आणि बहुसंख्य ग्राम वासिय मंडळी



उपस्थित होते. प्रसंगी जीवन बागडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. व शाळेला संविधानाची उद्देशिका भेट दिली.

शाळेचे मुख्याध्यापक अशोक लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील यशस्वी वाटचाली करीता शुभेच्छा देऊन मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका अर्चना सुखदेवे मॅडम यांनी केले. आभार प्रदर्शन सविता उईके यांनी केले.

# तनय देशकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## चिचगांव येथे नवीन डी.पी. बसविण्याच्या कामाला सुरूवात

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील चिचगाव येथील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वीज



समस्येला अखेर दिलासा मिळाला असून नवीन डी.पी. (Distribution Transformer) बसविण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

चिचगाव येथे जुनी व क्षमतेपेक्षा अधिक भार वहन करणारी डी.पी. असल्यामुळे वारंवार कमी दाबाचा (लो व्होल्टेज) प्रश्न निर्माण होत होता. यामुळे शेतकऱ्यांच्या शेती व सिंचनावर गंभीर परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर तनय देशकर यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांसह २७ एप्रिल २०२६ रोजी महावितरण विभागाच्या कार्यकारी अभियंतांना निवेदन देत तात्काळ नवीन डी.पी. बसविण्याची आग्रही मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत महावितरण प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत नवीन डी.पी. बसविण्याचे काम आता प्रत्यक्ष सुरू केले आहे. त्यामुळे येत्या काळात चिचगाव परिसरातील वीज पुरवठा सुरळीत होणार असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या कामाच्या सुरुवातीमुळे चिचगाव परिसरातील शेतकरी व नागरिकांनी समाधान व्यक्त करत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांचे आभार मानले आहेत. यावेळी तनय देशकर यांनी सांगितले की, 'शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे हेच आमचे प्राधान्य असून भविष्यातही अशाच पद्धतीने जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहू.'

# डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच एच एच सी (१२ वी) च्या परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहिर करण्यात आला. त्यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरीचा निकाल ६० टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थिनी कला शाखेमधून प्रथम क्रमांक कु. युरानी भाऊराव बागडे हिने ८०.८३ टक्के प्राप्त केले. तर व्दितीय कु.सायली कृष्णा ताडपल्लीवार ७९.३३ टक्के गुण प्राप्त केले व तृतीय क्रमांक कु. श्रावणी पुरुषोत्तम मैंद ५९.३३ टक्के प्राप्त करून पटकविले आहे.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रकाशभाऊ बगमारे, उपाध्यक्षा मा.निशाताई बगमारे, महाविद्यालयाच्या प्राचार्य शारदाताई ठाकरे, प्रा.कु. एच.जे.बगमारे, प्रा.एस. के.खोब्रागडे, गोवर्धन दोनाडकर यांसह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विदयार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सैनिक शेतकरी वेलफेअर फाऊंडेशन तर्फे सुकन्या योजनेचा लाभ




ब्रम्हपुरी/का.प्र.

सैनिक शेतकरी वेलफेअर फाऊंडेशन च्या वतीने खंडाळा (ब्रम्हपुरी) येथील रहिवासी राणी कमलाकर कोल्हे यांना मुलगी जन्मास आल्यामुळे सैनिक शेतकरी सुकन्या योजने अंतर्गत पाच हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

राणी कमलाकर कोल्हे ह्या गरोदर असतांनाच मागील तीन महिन्यापूर्वी सैनिक शेतकरी वेलफेअर फाऊंडेशनचे सभासदत्व स्वीकारले होते व त्यांना कन्यारत्न जन्मास आली. त्यामुळे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनोजकुमार डांगे, उपाध्यक्ष निलेश निकम, सचिव संजय सतई यांच्या मार्गदर्शनाखाली मुलीच्या उज्वला भविष्या करिता पाच हजार रुपयांचा धनादेश राणी कमलाकर कोल्हे ह्यांच्या राहते घरी SSWF चे नागपूर विभागीय अध्यक्ष तथा चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष संजय कुथे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी ब्रम्हपुरी तालुका अध्यक्ष रामराज पंचभाई, विभाग प्रमुख वैशाली माकडे, संजयजी बिजवे, गजानन भुरले, निकिता मेश्राम, लीना डेंगे तसेच खंडाळा येथील सरपंच अर्चना डेंगे, प्रितम भोयर पो. पाटील, वर्षा घुमे आशा वर्कर, रिना बनकर, सोनी राखडे, सरीता सहारे प्रामुख्याने उपस्थित होते.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता बारावीचा निकाल दिनांक २ मे२०२६ ला जाहीर केला. ब्रम्हपुरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखली. महाविद्यालयाचा एकूण निकाल (८४टक्के) लागला.

विज्ञान शाखेतून तन्मय महेंद्र भांडारकर या विद्यार्थ्याने (८८.६७ टक्के) इतके गुण मिळवून महाविद्यालयातून पहिला येण्याचा मान पटकावला. आर्यन कृष्णागर नंदनवार( ८८.३३ टक्के) गुण मिळवून द्वितीय क्रमांक आणि स्पंदन कृष्णा सांगोळे या विद्यार्थ्याने (८६.३३ टक्के)इतके गुण मिळवून महाविद्यालयातून तिसरा क्रमांक पटकावला. कला शाखेतून अभय मारुती उरकुडे या विद्यार्थ्याने (७८ टक्के)गुण मिळवून प्रथम येण्याचा मान पटकावला तर मोरेश्वर विजय अवसरे याने(६० टक्के) मिळवून द्वितीय व लखन राजू गेडाम याने (५८.८३ टक्के)गुण मिळवून तृतीय येण्याचा मान पटकावला. वाणिज्य शाखेतून पियुष तुळशीराम मानकर या विद्यार्थ्याने (६५.७१ टक्के) मिळवून प्रथम , कु.श्रुती तुकाराम शिऊरकर या विद्यार्थिनीने (६१.१७ टक्के) इतके गुण मिळवून द्वितीय तर अंशू अंकुश गजबे याने( ५४ टक्के)मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी सत्कार व अभिनंदन केले. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ राजेश कांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. मनोज चांभारे व सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ फार्मसीचा १०० टक्के निकाल

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेर अंतर्गत हिवाळी २०२५ ला घेण्यात आलेल्या बी फार्मसी प्रथम वर्ष सेम एक आणि द्वितीय वर्ष सेम तीन चा निकाल जाहीर झाला असून यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ फार्मसी ब्रम्हपुरी आपल्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखलेली आहे.

बी फार्मसी सेम वन मध्ये कुमारी सादिया जाकीर अली सय्यद प्रथम (CGPA 8.34) तर कुमारी सानिया राजेंद्र धोटे द्वितीय (CGPA 8.22) तसेच बी फार्मसी सेम तीन मध्ये प्रथम कुमारी श्रेया नरेंद्र बैसारे (SGPA 7.8) द्वितीय कुमारी शिवानी यशवंत खोब्रागडे (SGPA 7.6) प्राप्त करून प्राविण्य मिळविले आहे. संस्थेचे सचिव डॉ. देवेश कांबळे महाविद्यालयाचे प्राचार्य कुमारी सुविधा बागडे आणि प्राध्यापक यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**... QUOTES ...**

"If you believe something needs to exist. If it's something you want to use yourself, don't let anyone ever stop you from doing it."
- Tobias Lutke

**चारोळी**

रिमझिम रिमझिम बरसत्या पाऊसधारात
'मस्त मस्त भिजावेसे-गावेसे वाटते...
भिजतांना-गातांना कुणीतरी सोबत हवे',
पावसाळयात प्रत्येक बेडकाला असेच वाटते...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या १० वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ








ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १८ एप्रिल २०२६ रोजी एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव तथा स्कुलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर यांचे शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी दशेतील महत्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता दहावी. विद्यार्थ्यांच्या जीवनास नवी दिशा देण्याचे कार्य याच काळात घडते. जीवनातील ध्येयाकडे वाटचाल करण्यात हे वर्ष अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. विद्यार्थ्यांचे परिश्रम, जिद्द, चिकाटी यांची निर्णायक फलश्रुती दहावीच्या निकालाच्या माध्यमातून जाहीर झाली. शंतनू निलेश राऊत याने ९७.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. तर सोहम सागर आखाडे ९७.२ टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान तसेच सम्यक धोंगडे ९७ टक्के मिळवून तृतीय स्थान प्राप्त केले. शौर्य कुरसुंगे चतुर्थ ९६. ८ टक्के, सक्षम वसाके ९६.६ टक्के, सार्थ लेनगुरे ९६.२ टक्के, उत्कर्ष नाकाडे, ९५.४ टक्के, मैथीली चौधरी ९५ टक्के, पुर्वा हेमके ९५ टक्के, कुणाल कोकोडे ९५ टक्के, गुण मिळवून सीबीएसई दहावी मध्ये अव्वल स्थान प्राप्त केले.

एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या ३६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले. तर इतर सर्व विद्यार्थीदेखील चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. या सत्कार सोहळयात अव्वल येणाऱ्या प्रथम दहा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार भेटवस्तू व प्रशस्तीपत्र देऊन अशोकजी भैया सर यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थी व पालकांनी त्यांचे मनोगत सादर केले. एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे यश हे अशोकजी भैया सर यांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधा त्याचप्रमाणे स्कूलच्या संचालिका आशिता भैया मॅडम व प्राचार्य कुरेशी सरांनी विद्यार्थ्यांना केलेले उत्तम मागदर्शन यामुळेच प्राप्त केल्याचे पालक म्हणाले. विद्यार्थ्याच्या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत तर आहेच पण त्याहुनही शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर घेतलेले अथक परिश्रम विद्यार्थ्याच्या यशस्वितेमागे असल्याचे पालक व विद्यार्थी आवर्जून म्हणाले.


अशोकजी भैया सर विद्यार्थ्यांना मागदर्शन करतांना म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी येणाऱ्या काळात स्पर्धा परीक्षांवर जास्तीत जास्त भर द्यावा आणि देशाचे उज्वल भविष्य घडवावे' या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एल. एम. बी. पब्लिक स्कूल नेहमीच कटिबद्ध असेल असे प्राचार्यानी नमूद केले. या कार्यक्रमास आ. आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांची...

(पान क्र. १ वरून)

आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी द्विगुणित झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या जागतिक विक्रमाबद्दल शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले आहे. हा विक्रम केवळ वेळेचा नाही, तर विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचा आणि जिद्दीचा विजय आहे,असे मनोगत प्रसंगी अनेकांनी व्यक्त केले.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स


गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

## ब्रम्हपुरीत 'संघ गंगा के तीन भगीरथ' नाटकाचा भव्य प्रयोग आयोजित

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील सांस्कृतिक चळवळीला गती देण्यासाठी आणि राष्ट्रीय विचारांचा जागर करण्यासाठी ताराराणी फाउंडेशन (नागपूर-पुणे) आणि ब्रह्मपुरी अर्बन सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, संघाच्या पहिल्या तीन सरसंघचालकांच्या जीवनकार्यावर आधारित 'संघ गंगा के तीन भगीरथ' हे भव्य द्विअंकी हिंदी नाटक ब्रह्मपुरीकरांच्या भेटीला येत आहे.

ऐतिहासिक आणि प्रेरणादायी कथानक हे नाटक केवळ एक कलाकृती नसून, राष्ट्रनिर्मितीसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या तीन महान राष्ट्रपुरुषांच्या संघर्षाची गाथा आहे. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी आणि तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस या तीन 'भगीरथांनी' ज्याप्रमाणे निष्ठेने आणि कष्टाने संघकार्य वाढवले, त्याचा प्रभावी चित्रण या नाटकात पाहायला मिळेल. या नाटकाचे लेखन प्रसिद्ध लेखक श्रीधर गाडगे यांनी केले असून, दिग्दर्शन संजय पेंडसे यांनी केले आहे. नाटकाची निर्मिती सारिका पेंडसे यांची असून, नेपथ्य सतीश पेंडसे यांनी सांभाळले आहे. डॉ. भाग्यश्री चिटणीस यांनी या नाटकाला संगीतबद्ध केले आहे.

हा कार्यक्रम शनिवार, ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता, ने. ही. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील सभागृहात संपन्न होईल. विशेष म्हणजे हा प्रयोग सर्व नागरिकांसाठी पूर्णत: मोफत आहे. तरीही आसन व्यवस्था मर्यादित असल्याने प्रेक्षकांनी आपल्या प्रवेशिका आधीच प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या विनामूल्य प्रवेशिका 'ब्रह्मपुरी अर्बन को-ऑप बँक, ब्रह्मपुरी' येथे उपलब्ध आहेत. संपर्कासाठी ९४२२९०९४८५, ८२७५४००३३१, ९८३४८४-१२५१ वर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404